जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/३६२७/२०२२

वाहतूक नियंत्रण अधिसुचना                दिनांक - ०३/०९/२०२२

चिंचवड वाहतुक विभागाचे हद्दीत गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असुन ९ व्या दिवशी सार्वजनिक तसेच घरगुती गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात येणार असुन सदर दिवशी मोठ्या प्रमाणात पिंपरीमध्ये वाहतुक कोंडी निर्माण होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**चिंचवड वाहतूक विभाग**

१. अहिंसा चौक ते चाफेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- एसकेएफ चौकातुन खंडोबामाळकडुन मुंबई पुणे हायवेरोडने इच्छित स्थळी जातील.

२.दळवीनगर ब्रिज कडुन चाफेकर चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- एसकेएफ चौकाकडुन बिजलीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

३. वाल्हेकरवाडी टी जंक्शनकडुन चाफेकर चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारचे वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- वाल्हेकरवाडी जुना जकातनाका डावीकडे वळुन जैन शाळेपासुन बिजलीनगर अथवा एसकेएफ मार्गे खंडोबामाळ मार्गे इच्छितस्थळी जातील.

४. लिंकरोडवरुन चाफेकर चौकातील पीएमटी बसस्टॉप येथुन चाफेकर चौकात जाण्यास सर्व प्रकारचे वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- लिंकरोडने येणारे वाहन चालकांनी डावीकडे वळुन काळेवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील

५. भोई आळी तसेच चिंचवड चौकी येथुन चाफेकर चौकात जाण्यास सर्व प्रकारचे वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- केशवनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

६. चिंतामणी चौक वाल्हेकरवाडी रिव्हर व्हयु चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारचे वाहनांना प्रवेश बंदी
   - ➢ पर्यायी मार्ग- चिंचवडे फार्म वाल्हेकरवाडी लंडनब्रिज रावेत मार्गे इच्छित स्थळी जातील.

७. अहिंसा चौक व रिव्हर व्हयु चौकाकडुन चाफेकर उड्डानपुलावरुन येणारी वाहतूक बंदी करण्यात आली आहे.
   - ➢ पर्यायी मार्ग – रिव्हर व्हयु चौक कडुन वाल्हेकरवाडी मार्गे इच्छित स्थळी व अहिंसा चौक ते महावीर चौक किंवा एसकेएफ चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी चिंचवड वाहतुक विभागाचे हद्दीत गणपती विर्सजन व मिरवणुक असल्याने दि.९/९/२०२२ रोजी १५.०० ते २४.०० वा पर्यंत वरील प्रमाणे वाहतुक वळविण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

Scanned with CamScanner

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून सदरची बातमी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, चिंचवड वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बंधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner